# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

## दिनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत शहरी बेघर निवाऱ्यांच्या व्यवस्थापन (प्रचलन) आणि देखभालीसाठी संस्थांकडुन स्वारस्याचे अभिव्यक्ती (प्रस्ताव) मागविणे

**जाहिर निविदा** **(फॉर्म किंमत रु.1000/-)**

औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत शहरी बेघर निवाऱ्यांच्या व्यवस्थापन (प्रचलन) आणि देखभालीसाठी संस्थांकडुन (NGO/CBO) यांच्याद्वारे 09 ठिकाणांकरीता स्वारस्याचे अभिव्यक्ती(EOI)/ प्रस्ताव मागविण्यासाठी अर्ज मागवित आहेत.

| अ.क्र. | विभाग | शहरी बेघर निवारे पत्ता |
|---|---|---|
| 1 | अ | कोहिनुर कॉलनी, पिठाच्या गिरणी जवळ, औरंगाबाद. |
| 2 | अ | मंजुरपुरा, मनपा हॉल, औरंगाबाद. |
| 3 | अ | नविन वसाहत चेतनानगर, हर्सुल, औरंगाबाद. |
| 4 | ब | सिडको एन-6 सेंट्रल नाका स्मशानभुमी समोर, औरंगाबाद. |
| 5 | ड | गांधीनगर, मॉडेल मिडल स्कुल, जाफरगेट, औरंगाबाद. |
| 6 | ड | मोतीकारंजा, मनपा शाळा मोंढा रोड, औरंगाबाद. |
| 7 | फ | रेल्वेस्टेशन संत गाडगेबाबा सभागृह, भाजी मंडी, औरंगाबाद. |
| 8 | ई | चिकलठाणा जुने वार्ड कार्यालय, भाजीमंडी, औरंगाबाद. |
| 9 | ई | चिकलठाणा जुने वार्ड कार्यालय, अभ्यासिका, औरंगाबाद. |

औरंगाबाद महानगरपालिकेच्या www.aurangabadmahapalika.org या संकेतस्थळावर स्वारस्याची अभिव्यक्ती (EOI) संदर्भात तपशीलवार माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

इच्छुक NGO/CBO यांनी हितसंबंध मागविण्याचे अर्ज पुर्णपणे भरुन त्यासोबत संबंधीत कागदपत्रे जोडुन उपआयुक्त तथा शहर प्रकल्प अधिकारी, दिनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान, शहर अभियान व्यवस्थापन कक्ष, महानगरपालिका यांचेकडे सादर करावे. स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) अर्ज विक्रीसाठी लेखा विभाग, महानगरपालिका यांचेकडे ठेवण्यात आले आहेत. अर्ज दिनांक 20/05/2016 ते 26/05/2016 पर्यंत कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील. दिनांक 27/05/2016 रोजी दुपारी 2.00 वाजेपर्यंत स्वारस्य अभिव्यक्ती/प्रस्ताव संस्थांनी द्विनोंद लिफाफयाचा वापर करुन लिफाफा क्र.1 मध्ये तांत्रिक प्रस्ताव परिशिष्ट अ,ब,क नुसार व लिफाफा क्र.2 मध्ये व्यवसायीक दरपत्रक (देकार) परिशिष्ट ड नुसार सादर करावे. प्राप्त प्रस्तावांची संस्थेच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत छाननी करण्यात येईल व पात्र संस्थांना पुढील प्रक्रियेसाठी कळविण्यात येईल. प्रस्ताव सादर करतेवेळी संस्थांनी लिफाफयावर कोणत्या निवारा गृहासाठी अर्ज करत आहात याची ठळक अक्षरात नोंद करावी. दुरध्वनी क्र.0240-2333536-40 संपुर्ण प्रक्रियेच्या वेळांचे नियोजन खालीलप्रमाणे राहील.

1. स्वारस्याचे अभिव्यक्ती (EOI)/तांत्रिक प्रस्ताव सादर करण्याचा अंतीम दिनांक (जोडपत्र-अ,ब व क नुसार) 27 मे 2016 दुपारी 2.00 वाजेपर्यंत
2. शक्य झाल्यास निविदा (व्यवसायीक दरपत्रक) दि.27 मे 2016 रोजी दु.03.00 वाजता उघडण्यात येतील. व तांत्रिक सादरीकरण परिशिष्ट ब व क नुसार घेण्यात येईल.

19-05-16

**(ओम प्रकाश बकोरिया)**
**आयुक्त,**
महानगरपालिका औरंगाबाद.

# स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) सादर करणेबाबत पत्र.

दिनांक:    /    /201

**प्रति,**

**मा.आयुक्त,**

महानगरपालिका औरंगाबाद.

**विषय :- शहरी बेघर निवारा केंद्र (०१ वर्षांकरीता) व्यवस्थापन (प्रचलन) व देखभाल करणेसाठी प्रस्ताव सादर करणे बाबत.**

संदर्भ :- दिनांक    /    /२०१६ रोजीची वर्तमानपत्रातील जाहिरात.

**महोदय,**

वरील संदर्भिय विषयान्वये आम्ही ------------------------------------------संस्था औरंगाबाद या पत्राद्वारे स्वारस्याची अभिव्यक्ती सादर करीत आहोत.

१. सदरील अभिव्यक्ती शहरी बेघर निवारा व्यवस्थापन (प्रचलन) व देखभाल ---------------- ------------ या ठिकाणासाठी (परिशिष्ट-ई नुसार) देत आहोत.

२. DAY-NULM विभाग,महानगरपालिका औरंगाबाद यांनी घालुन दिलेल्या अटींनुसार तसेच (EOI) स्वारस्य अभिव्यक्ती च्या आपण वेबसाईटवर प्रसिध्द केलेल्या माहितीनुसार आम्ही आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केली आहे.

३. आपण मागविलेल्या स्वारस्य अभिव्यक्तीच्या नियम व अटींना अधिन राहुन सदरील माहिती सादर करण्यात आली आहे. आपणास सादर करण्यात आलेली माहिती संपुर्णत: खरी व बरोबर आहे. सदरील माहिती खोटी अथवा चुकीची आढळल्यास त्याची सर्वकष (सर्वस्वी) जबाबदारी आमची राहील.

**संस्थेचे नाव, सही व शिक्का**

**दिनांक :**

**स्थळ :**

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

## दिनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत शहरी बेघर निवाऱ्यांच्या व्यवस्थापन (प्रचलन) आणि देखभालीसाठी संस्थांकडुन स्वारस्याचे अभिव्यक्ती (प्रस्ताव) मागविणे

## जाहिर निविदा

(फॉर्म किंमत रु.1000/-)

❖ **मार्गदर्शक अटी व नियम संदर्भ :-**

मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्र.196/2001 दाखल करण्यात आलेली होती. उपरोक्त याचिकेच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाने शहरी भागामध्ये बेघर व निराश्रीत नागरिकांकरीता रात्रनिवारे सुरु करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने शासन नगर विकास विभाग मंत्रालय, महाराष्ट्र राज्य सरकारच्या ठराव क्र. MISC-2010/CR-45(Part2)/UD-20 Dated 14 July 2011 अन्वये रात्र निवारे कार्यान्वित करणे, त्यांचे व्यवस्थापन (प्रचलन) व देखभाल या विषयी मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली आहेत. त्यानुसार महानगरपालिका औरंगाबाद अंतर्गत शहरी बेघर व्यक्तींसाठी 2011 पासुन निवारागृहांची उभारणी करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत चालु असणारे 07 व 02 नविन निवारागृह अनुभवी (NGO/CBO) संस्थांच्या मार्फत चालविण्यासाठी संस्थांकडुन स्वारस्य अभिव्यक्ती (प्रस्ताव) मागविण्यात येत आहेत. महानगरपालिकेच्या www.aurangabadmahapalika.org/ या संकेतस्थळावर स्वारस्याची अभिव्यक्ती (EOI) संदर्भात तपशीलवार माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

❖ **Scope of Work :-** शहरी बेघरांसाठी निवारा केंद्र चालविणे.(कालावधी 1 वर्ष) 09 ठिकाणांसाठी (07 पुर्वीपासुन चालु असणारे व 02 नविन)

❖ **संस्थेच्या च्या भुमीका/जबाबदाऱ्या :-**

- शहरातील बेघर व्यक्तींची पाहणी करुन त्यांची संख्या निश्चित करणे. व सदरील पाहणी अहवाल DAY-NULM विभाग महानगरपालिका कार्यालयात सादर करणे.
- पाहणी अहवालानुसार लक्ष्य गटांची तसेच त्यांच्या गरजांची निश्चीती करणे.
- लाभार्थ्यांना पुरेशी-बेड व्यवस्था करुन देणे.
- सर्व लाभार्थ्यांना लॉकर सुविधा उपलब्ध करुन देणे.
- प्रथमोपचार पेटी (First Aid Box) सुविधा पुरविणे.
- पिण्यासाठी स्वच्छ व शुध्द पाणी व्यवस्था पुरविणे.

- प्रशिक्षीत व आवश्यक ते पुरेसे मनुष्यबळ पुरविणे.
- दर्जेदार आहार (जेवणाची) सुविधा पुरविणे. (चहा, नाष्टा व दोनवेळचे जेवण)
- बादल्या, मग, साबण, पुरेश्या प्रमाणात पुरविणे.(प्रती 5 लाभार्थी एक बादली,मग, प्रती लाभार्थी एक साबण).
- गरजेनुसार 24x7 सुरक्षा व्यवस्था पुरविणे.
- मागणीनुसार गादी, उशी, बेडशीट (चादरी),पाणी व लाईट, पंखे, ट्युब लाईट इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देणे.
- शौचालय व स्नानगृह सुविधा पुरविणे.
- शहरी बेघर निवारा स्त्री व पुरुष यांच्या निवासाची सोय वेगवेगळया ठिकाणी करण्यात यावी.
- बालसंगोपन सुविधा (जवळच्या अंगणवाडीशी सांगड घालुन देणे.)
- लाभार्थ्यांना आवश्यकतेनुसार विविध शासकीय योजनांशी सांगड घालुन देणे.
- इतर आवश्यक सुविधा.

## शहरी बेघर निवारा केंद्र चालवित असतांना संस्थांनी पाळावयाची मार्गदर्शक तत्वे

1. कोणतीही बेघर व्यक्ती निवारा गृहात त्यांच्या मर्जीने अथवा पोलिसांमार्फत आली असता सदरील बेघर व्यक्तींचे नाव, पत्ता, वय, शिक्षण, कामाचे स्वरुप, सामाजिक व आर्थिक स्थिती रजिस्टरमध्ये नोंदणीकृत करावे. तसेच सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन फोटो व ओळखपत्र घ्यावे.
2. बेघर व्यक्तींची नोंदणी झाल्यानंतर सदरील व्यक्तीस बेड देण्यात यावा. तसेच उपलब्ध असलेल्या सोई-सुविधांची तसेच निवाऱ्यांमधील पाळावयाच्या नियम व शिस्तीबद्दल माहिती द्यावी तसेच निवारा गृहामध्ये सदरील नियमांचे फलक डकवण्यात यावे.
3. नोंदणी रजिस्टर मध्ये येण्याची वेळ-तारीख, जाण्याची वेळ-तारीख नोंद करणे आवश्यक आहे. तसेच निवारागृह सोडण्यासाठीची आवश्यक ती कार्यवाही होईपर्यंत सदरील व्यक्तीस निवारा गृह सोडता येणार नाही.
4. शहरी बेघर निवारागृहात कोणत्याही प्रकारचे मद्य, तंबाखु, गुटखा,सिगारेट तत्सम बाबी निषिध्द असतील व त्या संदर्भात ठळक सुचना फलक लावणे आवश्यक राहील.
5. शहरी बेघर निवारा गृहात 24x7 सुरक्षा व्यवस्था तैनात असणे गरजेचे आहे.
6. शहरी बेघर निवारा गृह चालविणाऱ्या संस्थांनी निवारा गृहात येणाऱ्या लाभार्थ्यांची सर्वंकष (परिपुर्ण) माहीती जसे की, सामाजिक, आर्थिक-स्तर, शिक्षण, अवगत कौशल्य, रोजगाराची साधने, बौध्दीक पात्रता याची माहिती घ्यावी. सदरील माहितीच्या आधारे गरजुंना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देता येईल, तसेच संदर्भीय माहिती DAY-NULM विभाग महानगरपालिका यांना सादर करावी.
7. या माहितीच्या आधारावर संस्थांनी महानगरपालिकेच्या विविध विभागांच्या समन्वयाच्या माध्यमातुन बेघर लाभार्थ्यांसाठी आवश्यकतेनुसार समुपदेशन कार्यशाळा अयोजित कराव्यात. जेणेकरुन या लाभार्थ्यांना वेगवेगळया योजनांचा फायदा त्यांच्या उन्नतीसाठी करता येईल.
8. शहरी बेघर निवारागृहासाठी इमारत महानगरपालिकेतर्फे उपलब्ध करुन देण्यात येईल, परंतु ईमारतीची देखभाल करण्याची जबाबदारी सदरील संस्थेची राहील. ईमारतीमध्ये संस्थेला स्वतःच्या सोयीनुसार कोणतेही बदल करता येणार नाहीत.
9. शहरी बेघर निवारागृहात कोणतीही अप्रिय घटना घडल्यास संबंधीत संस्था सर्वस्वी जबाबदार राहील.
10. स्वयंसेवी संस्थांनी बेघर निवारा गृहांची शहरामध्ये जास्तीत जास्त माहिती प्रसारित करावी. तसेच जाहिरात करावी जेणे करुन शहरातील बेघर व्यक्तींना निवारा गृहांची माहिती मिळेल व लाभ घेता येईल.
11. शहरी बेघर निवारा गृहातील लाभार्थी जर शाळेत जाणाऱ्या वयोगटातील असतील तर सदरील लाभार्थ्यांना शासकीय शाळांमध्ये प्रवेश मिळवून दयावा.

❖ <u>संस्था निवडीचे निकष व पात्रता :-</u>

1. अर्ज करणारी संस्था ही संस्था नोंदणी अधिनियम 1860 व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 अंतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.व 03 वर्षापुर्वी नोंदणी झालेली असावी.
2. अर्ज करणाऱ्या संस्थेला किमान 03 वर्ष सामाजिक कार्य व सामाजिक उपक्रमांमध्ये काम करण्याचा अनुभव असावा.
3. संस्थेचे मागील 03 वर्षांचे लेखापरिक्षण अहवाल असणे आवश्यक आहे.
4. संस्थेच्या बँक खात्यावर किमान 03 लाख रुपये एवढी रक्कम शिल्लक/जमा असणे आवश्यक आहे.
5. ज्या संस्थेची निवड केली जाईल त्या संस्थेला रुपये 25000/- अनामत स्वरुपात भरणा करावी लागेल.
6. संस्थेचे मागील 01 वर्षांचे बँक स्टेटमेंट्स असणे आवश्यक आहे.
7. संस्थेची घटना व नियमावली सादर करणे आवश्यक आहे.
8. अर्ज करणारी संस्था सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद येथेच नोंदणीकृत असावी व महानगरपालिका कार्याक्षेत्रातच किमान तीन वर्ष कार्यरत असावी.
9. सदरील संस्थेचे मुख्यालय अथवा शाखा कार्यालय औरंगाबाद शहरात असणे आवश्यक आहे.
10. शहरी बेघर निवारा प्रस्ताव सादर करतेवेळी/पुर्वी सदरील संस्था शासकीय/निमशासकीय तसेच कुठल्याही संस्थेद्वारे काळया यादीत (Black List) टाकलेली नाही या बाबतचे हमीपत्र सादर करावे.
11. प्रस्ताव सादर करतेवेळी/पुर्वी सदरील संस्था शासन अथवा महानगरपालिका औरंगाबाद यांचे सोबत कायदेशीर विवादास्पद नसावी.
12. संस्थेची निवड एका वर्षासाठी असेल व काम समाधान कारक असल्यास पुढे मुदत वाढ देण्याचा विचार करण्यात येईल. या संदर्भातील सर्व अधिकार मा.आयुक्त यांनी राखुन ठेवले आहेत.
13. एका संस्थेस एका पेक्षा जास्त शहरी बेघर निवारागृह चालविण्यासाठी मंजुरी देण्यात येणार नाही.
14. निवड झालेल्या संस्थांना महानगरपालिकेकडुन वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे/आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.
15. वर दर्शविलेल्या पात्रता व अटी संदर्भातील सर्व कागदपत्रे प्रस्तावासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

## ❖ स्वारस्य अभिव्यक्ती (प्रस्ताव) सादर करण्यासाठीच्या सुचना

1. संस्थांनी परिशिष्ट अ ,ब व क नुसार प्रस्ताव सादर करावेत.
2. DAY-NULM विभाग,महानगरपालिका औरंगाबाद अंतर्गत मा.आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त निवड समितीकडुन विहीत कार्यपध्दतीनुसार प्रस्तावांची छाननी करण्यात येईल.
3. प्रस्ताव छाननीनंतर निवड झालेल्या संस्थांनाच व्यावसायीक दरपत्रक (देकार) उघडणे व तांत्रिक सादरीकरणासाठी बोलविण्यात येईल.
4. तांत्रिक सादरीकरणासाठी बोलविण्यात आलेल्या संस्था या अंतीम निवडीसाठी पात्र असतीलच असे नाही.
5. कुठलेही कारण न देता प्रस्ताव स्विकारण्याचा/नाकारण्याचा तसेच प्रस्ताव प्रक्रिया स्थगित अथवा बदल करण्याचा अंतीम अधिकार, निवडीची अंतीम प्रसिध्दी होईपर्यंत निवड समितीने राखुन ठेवलेले आहेत.
6. संस्थेला मानधन हे शासन निकषाप्रमाणे देण्यात येईल.
7. संस्था, अध्यक्ष,सचिव, सदस्य यांनी महानगरपालिका औरंगाबाद यांची मालमत्ता कर, पाणीपट्टी इत्यादी चालु वर्षापर्यंत भरल्याची पावती सादर करणे आवश्यक आहे. व अशी कोणत्याही प्रकारची मालमत्ता संबंधितांकडे नसेल तर रु.100/- च्या बाँडपेपरवर एकत्रीत शपथपत्र सादर करावे.
8. संस्थेची निवड एका वर्षांसाठी असेल व काम समाधान कारक असल्यास पुढे मुदत वाढ देण्याचा विचार करण्यात येईल. या संदर्भातील सर्व अधिकार मा.आयुक्त यांनी राखुन ठेवले आहेत.
9. एका संस्थेस एका पेक्षा जास्त शहरी बेघर निवारागृह चालविण्यासाठी मंजुरी देण्यात येणार नाही.
10. निवड झालेल्या संस्थांना महानगरपालिकेकडुन वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे/आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.
11. अपुर्ण तसेच विहीत नमुन्यात नसलेल्या प्रस्तावांचा विचार करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भात कुठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार/संपर्क साधण्यात येणार नाही.
12. कुठल्याही प्रकारचा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास संदर्भीय संस्थेचा प्रस्ताव फेटाळण्यात/अपात्र ठरविण्यात येईल.
13. राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत पुर्वीपासुन सुरु असलेले 07 बेघर निवारा गृह चालविण्यासाठी निवड झालेल्या संस्थांना दि.01/06/2016 पासुन कार्यादेश देण्यात येतील. व नविन 02 निवारागृह चालविण्यासाठी निवड झालेल्या संस्थांना सदर ईमारतींच्या दुरुस्तीनंतर कार्यादेश देण्यात येतील.
14. संस्थांनी प्रस्तावात सादर केलीली माहिती व कागदपत्रे, खोटी अथवा चुकीचे आढळल्यास संदर्भीय संस्थेचा प्रस्ताव कुठल्याही टप्प्यावर (Stage) अपात्र ठरविण्यात येईल.
15. निवड झालेल्या संस्थांनी दिलेल्या तारखेच्या आत करारनामा विहीत अटी व शर्तीसह DAY-NULM विभाग महानगरपालिकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे सादर कारावा. (करारनामा प्रारुप नमुना DAY-NULM विभागाकडुन प्राप्त करुन घ्यावा.)
16. स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) अर्ज विक्रीसाठी लेखा विभाग मनपा यांचेकडे ठेवण्यात आले आहेत.

## परिशिष्ट-अ

**अर्जाचा नमुना** **(फॉर्म किंमत रु.1000/-)**

1. संस्थेचे नाव व पत्ता.
2. दुरध्वनी/भ्रमणध्वनी/फॅक्स नं.
3. ई-मेल आयडी/वेब साईट.
4. संस्थेच्या कार्यरत पदाधिकारी व कार्यकारीणीचे नाव,पत्ता,दुरध्वनी, व्यवसाय, ई-मेल.
5. संपर्क व्यक्ती पद, नाव, पत्ता,फोन नं, ई-मेल.
6. संस्थेचा प्रकार (NGO/CBO).
7. संस्थेद्वारे वेळोवेळी आयोजित केलेल्या कार्यक्रमांची यादी,फोटो, कात्रणे इत्यादी.
8. संस्था नोंदणी प्रमाणपत्र संस्था नोंदणी अधिनियम 1860 आणि मुंबई. सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्राच्या छायांकित व साक्षांकित प्रती.
9. संस्थेची घटना व नियमावलीची प्रत.
10. संस्थेचा मागील 03 वर्षांचा वर्षनिहाय लेखा परिक्षण अहवाल.
11. कर्मचारी वर्गाचे शैक्षणिक पात्रता व अनुभवाचे प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती.
12. संस्थेचे मागील एक वर्षांचे बँक स्टेटमेंट.
13. संस्थेद्वारे पुर्वी चालवण्यात येणाऱ्या व सद्यस्थितीत चालवत असलेल्या प्रकल्प व उपक्रमांची यादी.
14. संस्था, अध्यक्ष,सचिव, सदस्य यांनी महानगरपालिका औरंगाबाद यांची मालमत्ता कर, पाणीपट्टी इत्यादी चालु वर्षापर्यंत भरल्याची पावती सादर करणे आवश्यक आहे. व अशी कोणत्याही प्रकारची मालमत्ता संबंधितांकडे नसेल तर रु.100/- च्या बाँडपेपरवर एकत्रीत शपथपत्र सादर करावे.
15. राज्य व केंद्र शासन, निमशासकीय तसेच स्थानिक स्तरावरील संस्थां अंतर्गत काळया यादीत नाव नसलेबाबतचे शपथपत्र/हमीपत्र.
16. कुठल्याही न्यायालयीन प्रक्रियेत गुन्हेगारी स्वरुपाचा खटला चालु नसलेबाबत अथवा शिक्षा झाली नसलेबाबत शपथपत्र/हमीपत्र.
17. अर्ज करणाऱ्या संस्थेला सामाजिक कार्य/सामाजिक उपक्रमांमध्ये किमान 03 वर्ष अनुभव असल्याचे पुरावे.
18. अर्ज करणारी संस्था महानगरपालिका कार्यक्षेत्रात 03 वर्षांपासुन कार्यरत असल्याचा पुरावा.
19. संस्थेच्या शहरातील कार्यालयांची/शाखांची तसेच चालविण्यात येणाऱ्या केंद्रांचे नाव, ठिकाण व संपर्क क्रमांक तसेच प्रकल्प/उपक्रमांची सविस्तर माहिती (परिशिष्ट-ब नुसार).
20. संस्थेला मिळालेल्या विशेष पुरस्कार, अनुभव इत्यादी बाबतचे कागदपत्रे (ऐच्छिक)
21. तांत्रिक प्रस्ताव (परिशिष्ट-क नुसार).

**संस्थेचे नाव, सही व शिक्का**

## परिशिष्ट-ब

**(फॉर्म किंमत रु.1000/-)**

❖ **मागील 03 वर्षांचे चालु/पुर्ण झालेले प्रकल्प/उपक्रम**

खालील माहिती खाली दिलेल्या विहित नमुन्यात सादर करावी तसेच प्रत्येक प्रकल्पाची माहिती वेगवेगळी द्यावी.

1. प्रकल्पाचे नाव:-

अ) प्रकल्प कालावधी :-

ब) प्रकल्प किंमत :-

2. मातृ संस्थेचे नाव :-

3. प्रकल्पाचे ठिकाण (औरंगाबाद शहरातील):-

4. पत्ता व दुरध्वनी क्रमांक :-

5. कर्मचारी नाव व पदनिहाय माहिती :-

6. प्रकल्पासाठी पुरविण्यात आलेले कर्मचारी संख्या:-

7. फोन नं:-

8. मातृ संस्थेचा संपर्क व्यक्तीं (पद), मो.नं. व ईमेल :-

9. प्रकल्प चालु झाल्याचा दिनांक (महिना,वर्ष) :-

10. प्रकल्प पुर्ण झाल्याचा दिनांक (महिना,वर्ष) :-

11. संस्थेकडुन चालविण्यात येणाऱ्या प्रकल्पांची सविस्तर माहिती :-

12. संस्थेची प्रकल्पातील भुमिका व पुरविण्यात आलेल्या सेवा/सुविधा:-

13. संस्थेद्वारे विविध प्रकल्पाच्या माध्यमातुन लाभ देण्यात आलेले लाभार्थी घटक:-

14. प्रकल्प साध्य/निष्पती (Outcome of Project) :-

**संस्थेचे नाव, सही व शिक्का**

**परिशिष्ट-क**

**(फॉर्म किंमत रु.1000/-)**

# तांत्रिक प्रस्ताव नमुना

1. शहरी बेघर निवारा प्रकल्पाची व्याप्ती व वाव

❖ **प्रकल्प व्यवस्थापन**

- शहरी बेघर निवारा चालविण्याचे नियोजन व कार्यपध्दती.
- प्रकल्प चालविणाऱ्या संस्थेची जबाबदारी.
- प्रकल्पांसाठी लागणारे मनुष्यबळ.
- शहरी बेघर निवारा चालवत असतांना कामाची गुणवत्ता कशी राखली जाईल.
- कामाचे नियंत्रण व मुल्यांकन कसे करण्यात येईल.

❖ **संस्थेकडे उपलब्ध असणाऱ्या पायाभुत सुविधा**

1. प्रशिक्षीत कर्मचारी वर्ग
2. इतर कर्मचारी वर्गांची यादी (Support Staff)
3. इतर उपलब्ध सोयी सुविधा

❖ शहरी बेघर निवारागृह चालविण्यांचे काम आपल्या संस्थेला का देण्यात यावे.

**संस्थेचे नाव, सही व शिक्का**

## परिशिष्ट-ड

(फॉर्म किंमत रु.1000/-)

# व्यावसायिक दरपत्रक (देकार)

| अ.क्र. | शहरी बेघर निवारा गृहाचे नाव | निवारा क्षमता | ऑफर | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | कोहिनुर कॉलनी | 20 | | |
| 2 | गांधीनगर | 80 | | |
| 3 | रेल्वेस्टेशन | 56 | | |
| 4 | सिडको एन-6 | 46 | | |
| 5 | हर्सुल | 20 | | |
| 6 | चिकलठाणा | 17 | | |
| 7 | मोतीकारंजा | 101 | | |
| 8 | मंजुरपुरा नविन) | 31 | | |
| 9 | चिकलठाणा (नविन) | 15 | | |

**शासन निषका प्रमाणे लाभार्थी क्षमतेनुसार आर्थिक तरतुद**

| अ.क्र. | निवारा लाभार्थी क्षमता | शासन निषका प्रमाणे आर्थिक तरतुद |
|---|---|---|
| 1 | 1 ते 20 लाभार्थी | 200000/- |
| 2 | 1 ते 30 लाभार्थी | 350000/- |
| 3 | 1 ते 40 लाभार्थी | 500000/- |
| 4 | 1 ते50 लाभार्थी व त्यापेक्षा जास्त | 600000/- |

**नोट :-**

स्वारस्य अभिव्यक्ती (EOI)/प्रस्तावामध्ये शासनाद्वारे देण्यात येणाऱ्या सेवा-सुविधां व्यतिरिक्त संस्थेद्वारे देण्यात येणाऱ्या जास्तीच्या सेवा-सुविधा (विविध उपक्रम/कार्यशाळा/आरोग्य शिबीरे... इत्यादी गोष्टींबाबत स्वारस्य अभिव्यक्ती (परिशिष्ट ड) शेरा या रकान्यामध्ये नमुद करावे.

**संस्थेचे नाव, सही व शिक्का**

## परिशिष्ट-ई

(फॉर्म किंमत रु.1000/-)

**दिनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान,**
**महानगरपालिका औरंगाबाद अंतर्गत**
**व्यवस्थापन (प्रचलन) व देखभाल करण्यात येणाऱ्या शहरी बेघर निवाऱ्यांची यादी**

| अ.क्र. | विभाग | शहरी बेघर निवारे पत्ता |
|---|---|---|
| 1 | अ | कोहिनुर कॉलनी, पिठाच्या गिरणी जवळ, औरंगाबाद. |
| 2 | अ | मंजुरपुरा, मनपा हॉल, औरंगाबाद. |
| 3 | अ | नविन वसाहत चेतनानगर, हर्सुल, औरंगाबाद. |
| 4 | ब | सिडको एन-6 सेंट्रल नाका स्मशानभुमी समोर, औरंगाबाद. |
| 5 | ड | गांधीनगर, मॉडेल मिडल स्कुल, जाफरगेट, औरंगाबाद. |
| 6 | ड | मोतीकारंजा, मनपा शाळा मोंढा रोड, औरंगाबाद. |
| 7 | फ | रेल्वेस्टेशन संत गाडगेबाबा सभागृह, भाजी मंडी, औरंगाबाद. |
| 8 | ई | चिकलठाणा जुने वार्ड कार्यालय, भाजीमंडी, औरंगाबाद. |
| 9 | ई | चिकलठाणा जुने वार्ड कार्यालय, अभ्यासिका, औरंगाबाद. |

17-05-16

**(ओम प्रकाश बकोरिया)**
**आयुक्त,**
महानगरपालिका औरंगाबाद.